महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५

दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल : pmu@mahapocra.gov.in

NDKSP-२२०१९(२१)/१६/२०२५-DBT दि. २८/ १० /२०२५

प्रति,

१. विभागीय कृषि सहसंचालक (प्रकल्पांतर्गत सर्व)

२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (प्रकल्पांतर्गत सर्व)

विषय : नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या घटकांच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे बाबत ..

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र.नादेकृ ४६२२/प्र.क्र.९४/८-अे, दि. १४/१०/२०२४.
२. शासन निर्णय क्र.कृवपदुम-१९०४६/३६/२०२५-MAG-8A (E-११६८०५०), दि. ०८/०७/२०२५.

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागांतर्गत, जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील एकूण २१ जिल्ह्यांमधील ७,२०१ गावे निवडण्यात आली आहेत. तसेच नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, टप्पा-२ च्या अंमलबजावणीस व जागतिक बँकेसोबत करारनामा करण्यास दिनांक ०८ जुलै २०२५ च्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. प्रकल्पाचा प्रमुख उद्देश शेतकऱ्यांना बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्यासाठी सक्षम करणे व कृषी आधारित उपजीविकेची साधने उपलब्ध करून शेती किफायतशीर करणे हा आहे. बदलत्या हवामानाचा शेतीला कमीत कमी फटका बसेल यासाठी गावनिहाय नियोजन करण्यात येत असून प्रकल्पांतर्गत वैयक्तिक शेतकऱ्यांना हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब करणेसाठी विविध घटक राबविण्यात येणार आहेत. त्याअनुषंगाने सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मध्ये नमूद केलेले घटकांच्या अंमलबजावणीसाठीच्या मार्गदर्शक सूचना या पत्रासोबत सहपत्रीत करण्यात येत आहेत.त्यानुसार प्रकल्पांतर्गत गावांमध्ये सदर घटकांची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच उर्वरित वैयक्तिक लाभाच्या घटकांच्या मार्गदर्शक सूचना यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

सोबत : घटकनिहाय मार्गदर्शक सूचना

(परिमल सिंह)
प्रकल्प संचालक
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प,मुंबई

प्रत- १. मा. अपर मुख्य सचिव (कृषि), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे.

# नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा २.०

## वानिकी आधारित शेतीपद्धती - वृक्ष लागवड मार्गदर्शक सूचना

**प्रस्तावना:**

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत असून, भविष्यात देखील सदर परिणामांची व्याप्ती वाढणार असल्याचे राज्याच्या हवामान बदलाविषयक कृती आराखडयामध्ये नमूद केले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांना गेल्या काही वर्षांपासून मोठया दुष्काळास सामोरे जावे लागत असून भू-गर्भातील पाणी साठयावर व जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. परिणामी शेतीमधील पिकांची उत्पादकता घटत आहे. या प्रतिकूल परिस्थितीमध्ये अल्पभूधारक शेतक-यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतक-यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाचा जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाचा दुसरा टप्पा सुरु करण्यात आलेला आहे.

वातावरणातील कर्ब वायूचे वाढलेले प्रमाण हा हवामान बदलाशी निगडीत असलेला महत्वाचा घटक आहे. या कर्ब वायूचे स्थिरीकरण (Carbon Sequestration) करण्याच्या प्रक्रियेमध्ये वृक्ष लागवड अतिशय प्रभावी ठरते. शेतक-यांच्या आर्थिक उन्नती बरोबरच हवामान बदलास कारणीभूत ठरणा-या कर्ब वायूचे स्थिरीकरण करणे, हा प्रकल्पाचा एक उद्देश आहे. सदर प्रकल्पांतर्गत वानिकी आधारित शेतीपद्धती-वृक्ष लागवड या घटकास प्राधान्य दिले आहे.

### १. उद्दिष्टे

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पात समावेश करण्यात आलेल्या गावसमुहात वानिकी आधारित शेतीपद्धती - वृक्ष लागवड या घटकाचे उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१. वातावरणातील कार्बन उत्सर्जनामुळे होणारे दुष्परिणाम कमी करण्यासाठी वृक्ष आच्छादन वाढविणे, जमिनीतील सेंद्रिय घटकांचे संवर्धन, पीक आणि पीक पद्धतीतून उत्पादकता वाढविणे.

२. शेतीपिकांना पूरक म्हणून शेतावर वृक्ष लागवडीखालील क्षेत्र वाढविणे.

३. शेतीपद्धतीवर आधारित वृक्ष लागवडीखालील क्षेत्रात वाढ करून एकमेकांना पूरक व एकात्मिक पद्धतीने पिकांची व पशुधनाची उत्पादकता वाढविणे, रोजगाराच्या संधी, उत्पन्नाच्या संधी व ग्रामीण भागातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांचे राहणीमान सुधारणे यासाठी प्रोत्साहन देणे.

४. विविध कृषि पर्यावरणीय प्रदेश आणि जमीन वापराच्या परिस्थितीनुसार वनशेतीसाठी अनुकूल पद्धती /आदर्श पद्धती लोकप्रिय करणे.

५. शेतीपद्धतीवर आधारित वृक्ष लागवड क्षेत्राचा विस्तार व क्षमता बांधणीसाठी सहाय्य करणे.

### २. लाभार्थी पात्रता निकष

२.१. शेतकऱ्यांच्या वैयक्तिक क्षेत्रावर वानिकी आधारित शेतीपद्धती अंतर्गत वृक्ष लागवड करणे अभिप्रेत आहे. यामध्ये लाभार्थीच्या शेतात, पडीक क्षेत्रात, शेताच्या बांधावर वृक्ष लागवडीस प्रोत्साहन दिले जाईल.

२.२. शेतकऱ्याच्या स्वत:च्या नावे ७/१२ उतारा असणे आवश्यक आहे. तथापि, जर लाभार्थी ७/१२ उताऱ्यावर संयुक्तपणे खातेदार असेल तर इतर सर्व खातेदारांचे वृक्ष लागवडीसाठी सहमतीपत्र बंधनकारक राहील.

२.३. जमीन कुळ कायद्याखाली येत असल्यास, ७/१२ च्या उताऱ्यावर जर कुळाचे नाव असेल तर सदर घटक राबविण्यासाठी कुळाचे सहमतीपत्र आवश्यक राहील.

२.४. सदर घटकाचा लाभ घेण्यासाठी किमान ०.१० हे. ते कमाल एकूण ५ हे. पर्यंत जमीन धारणा असलेले शेतकरी पात्र राहतील. परिघीय क्षेत्र व बांधावरील वृक्ष लागवडीसाठी किमान ०.४० हे. क्षेत्रासाठी अनुदान देय राहील.

२.५. निवड झालेल्या लाभार्थ्याने यापूर्वी (फळबाग/वृक्ष/बांबू इ.) लागवडीच्या अन्य योजनेंतर्गत शासकीय अनुदानाचा लाभ घेतला असल्यास, सदर लाभ घेतलेले क्षेत्र ५ हे. या कमाल मर्यादेतून वगळून उर्वरित क्षेत्रासाठी लाभार्थी पात्र राहतील.

## ३. वानिकी आधारित शेतीपद्धती - वृक्ष लागवड घटकांतर्गत समाविष्ट बाबी

या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी वनवृक्ष उदा. साग, कडूनिंब, चारोळी ,मोहगनी, हिरडा, बेहेडा, अंजन, अर्जुन, बिबा, खैर, शिवन, कडीपत्ता, शेवगा इ. स्थानिक कृषि हवामानास अनुकूल असणाऱ्या वृक्ष प्रजातींची लागवड करणे अपेक्षित आहे. शेतकऱ्यांच्या वैयक्तिक क्षेत्रावर वानिकी आधारित शेतीपद्धती - वृक्ष लागवड या घटकांतर्गत खालील बाबींचा समावेश आहे.

३.१. या घटकांर्गत शेतकऱ्यांना सलग शेतावर, शेताच्या बांधावर व पडीक जमिनीवर वृक्ष लागवड करता येईल.

३.२. सलग शेतावर वृक्ष लागवडीसाठी हेक्टरी १०० रोपे (१० x १० मी.) नुसार सहपत्रीत केलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे (परिशिष्ट - " अ ") अर्थसहाय्य देय राहील.

३.३. परिघीय क्षेत्र व बांधावरील वृक्ष लागवडीसाठी अनुदानाची परिगणना प्रत्यक्ष लागवड केलेल्या झाडांच्या संख्येनुसार करण्यात यावी. (जास्ती जास्त २० रोपे /हेक्टर मर्यादा)

३.४. परिघीय क्षेत्र व बांधावरील वृक्ष लागवडीसाठी किमान ०.४० हे. क्षेत्रासाठी अनुदान देय राहील.

३.५. वृक्ष लागवड अंतर्गत दोन वर्षांच्या कालावधीसाठी खड्डे खोदणे, माती व खतांच्या मिश्रणाने खड्डे भरणे, रोपे/कलमे लागवड करणे, नांग्या भरणे या बाबींचा समावेश आहे. या बाबींकरिता अर्थसहाय्य देय राहील.

## ४. अर्थसहाय्य व अनुदान मर्यादा

४.१. वानिकी आधारित शेतीपद्धती - वृक्ष लागवड या घटकांतर्गत **परिघीय क्षेत्र व बांधावरील** प्रती झाड लागवडीसाठी खालीलप्रमाणे आर्थिक मापदंड आहेत.

| अ.क्र. | बाब | प्रती रोप अंदाजे खर्च (रु.) |
|---|---|---|
| १ | खड्डा खोदणे (०.६० x. ०.६० x ०.६० मी.) | ३९ |
| २ | माती व खत मिश्रणाने खड्डे भरणे. | ४८ |
| ३ | रोपे/कलमे लागवड करणे.<br>लागवडीची १०० रोपे, रु ४०/- प्रती कलम रोपे (कमाल ) किंवा प्रत्यक्ष दर यापैकी जे कमी असेल ते. | ७१ |
| ४ | नांग्या भरणे. | १४ |
| | **एकूण** | **१७२** |

टिप : वृक्षांच्या संख्येच्या प्रमाणात खर्चाची परिगणना करण्यात येईल.

४.२. प्रकल्पांतर्गत वैयक्तिक लाभाकरिता परिघीय क्षेत्र व बांधावरील वृक्षलागवडीकरिता बाबनिहाय मंजूर केलेल्या मापदंडाच्या १००% टक्के किंवा जास्तीत जास्त रक्कम रु. १७२/- प्रती झाड अनुदान देय राहील.

४.३. वानिकी आधारित शेतीपद्धती - वृक्षलागवड या घटकांतर्गत **सलग शेतावर** लागवड याकरिता खालीलप्रमाणे आर्थिक मापदंड आहेत.

| अ.क्र. | सलग शेतावर वृक्षारोपण (प्रति हेक्टर कलमे संख्या) | एकूण खर्च रक्कम रु./हे. | अनुदान रक्कम (रु./हे) |
|---|---|---|---|
| १. | १००<br>( १० x १० मी.) | १७,२६२ | (१००%)<br>१७,२६२ |

**संदर्भ:** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वन विभाग सामाजिक वनीकरण शाखेमार्फत वृक्ष लागवड कार्यक्रम शासन निर्णय नियोजन विभाग (रोहयो प्रभाग) मग्रारो -२०१६/ प्र.क्र.६१/ मग्रारो-१ दि.१२ एप्रिल २०१८

४.४. रोपे / वृक्षांच्या संख्येच्या प्रमाणात खर्चाची परिगणना वर दर्शविल्यानुसार करण्यात येईल.

४.५. प्रकल्पांतर्गत वैयक्तिक लाभाकरिता बाबनिहाय मंजूर केलेल्या मापदंडाच्या १०० % अनुदान त्यांनी केलेल्या एकूण लागवडीच्या खर्चाप्रमाणे देय राहील .

४.६. सदर देय अनुदान दोन वर्षांसाठी विभागून देण्यात येईल. पहिल्या वर्षी देय अनुदानाच्या ६० % व दुसऱ्या वर्षी ४०% या प्रमाणात अनुदान अदा करण्यात येईल.

४.७. लाभार्थ्याने दुसऱ्या वर्षी कमीत कमी ८०% झाडे जिवंत ठेवल्यास दुसऱ्या वर्षाचे अनुदान देय राहील.

४.८. लागवड केलेल्या रोपांची मर झाल्यास लाभार्थ्याने रोखीने रोपे विकत घेऊन विहित प्रमाणात जिवंत झाडांची टक्केवारी राखावी.

४.९. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत निश्चित केलेल्या मजूरीच्या दरांमध्ये, तसेच, कृषि आयुक्तालयाने निश्चित केलेल्या सामुग्रींच्या दरामध्ये सुधारणा झाल्यास, या प्रकल्पांतर्गत वृक्ष लागवड घटकांमध्ये समाविष्ट असलेल्या प्रकल्प अनुदानीत बाबींचे दर त्याप्रमाणे वेळोवेळी सुधारीत करण्यात यावेत.

## ५. घटक अंमलबजावणी कार्यपद्धती

५.१. अर्ज करतेवेळी सर्व्हे नंबर, लागवड करावयाचे क्षेत्र व लागवडीचा प्रकार अचूक निवडणे.

५.२. लागवड अंतराचे परिमाण हे “मीटर” मध्ये देण्यात आलेले आहे.

५.३. प्रकल्पांतर्गत वृक्ष लागवड वर्षभरात केव्हाही करता येईल.

५.४. समूह सहाय्यक यांनी ऑनलाईन प्राप्त झालेल्या शेतकऱ्यांचे अर्ज पडताळणी करून ग्राम कृषि विकास समितीसमोर मान्यतेस सादर करणे व समितीचा ठराव संकेतस्थळावर अपलोड करणे. (डेस्क १)

५.५. सहाय्यक कृषि अधिकारी यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून प्रस्तावीत क्षेत्र हे वृक्ष लागवडीस तांत्रिक दृष्ट्या योग्य आहे काय, याची खात्री करणे. प्रकल्पाच्या DBT app मध्ये आवश्यक माहिती भरणे व भौगोलिक स्थानांकन (Geo tagging) सहित फोटो घेऊन ऑनलाईन स्थळ पाहणी अहवाल सादर करणे. (डेस्क २)

५.६. शेतकऱ्याने अर्ज केलेल्या क्षेत्राचे अंदाजपत्रक तयार करणे व पूर्वसंमती साठी ऑनलाईन सबमिट करणे.

५.७. शेतकरी निहाय अंदाजपत्रकास तालुका कृषि अधिकारी यांनी पूर्वसंमती प्रदान करणे (डेस्क ३). सदर पूर्वसंमती हीच या वृक्ष लागवड घटकासाठी तांत्रिक मंजुरी राहील.

५.८. पूर्वसंमती प्राप्त शेतकऱ्यांना वृक्ष लागवडीबाबत तांत्रिक प्रशिक्षण देण्यात यावे.

५.९. वृक्ष लागवडीसाठी पूर्वसंमती प्राप्त शेतक-यांनी नजीकच्या वन विभाग / कृषी विद्यापीठ/ कृषी संशोधन केंद्र/ कृषी विज्ञान केंद्र/ शासकीय रोपवाटिका/ किसान रोपवाटिका/ खाजगी रोपवाटिका इ. रोपवाटिकामधून वृक्ष रोपे खरेदी करणे.

५.१०. पूर्वसंमती प्राप्त झाल्यानंतर लाभार्थ्याने वृक्ष लागवड पूर्ण करणे.

५.११. शेतकऱ्याने लागवड पूर्ण झाल्यानंतर रोपे खरेदी व इतर साहित्य खरेदीचे देयके संकेतस्थळावर ऑनलाईन अपलोड करून अनुदान मागणी करणे.

५.१२. सहाय्यक कृषि अधिकारी यांनी वृक्ष लागवडीच्या मापन पुस्तिकेतील नोंदी, भौगोलिक स्थानांकनासह घेण्यात आलेले फोटो व मोका तपासणी अहवाल नोंदवून अपलोड करणे. (डेस्क ४)

५.१३. अनुदान मागणी प्रस्ताव व तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर लेखाधिकारी उपविभाग स्तर यांनी अनुदान प्रस्ताव तपासून शिफारशीत करण्यात आलेली रक्कम मार्गदर्शक सुचनेनुसार असल्याची खात्री करणे.

५.१४. त्यानुसार उपविभागीय कृषि अधिकारी यांनी मंजूर मापदंडानुसार देय असलेले अनुदान लाभार्थ्यांना अदा करण्यासाठी मापन पुस्तिका व देयके प्रमाणित करून त्याप्रमाणे डीबीटी प्रणालीमध्ये शिफारस करणे.

५.१५. दुसऱ्या वर्षाचे अनुदान हे लागवड केलेल्या दिनांकापासून एक वर्ष पूर्ण झाल्यानंतरच देय राहील.

५.१६. लाभार्थ्याने दुसऱ्या वर्षाचे अनुदान मागणी केल्यानंतर सहाय्यक कृषि अधिकारी यांनी वृक्ष लागवडीच्या दुसऱ्या वर्षीच्या मापन पुस्तिकेतील नोंदी, घेण्यात आलेले भौगोलिक स्थानांकनासह फोटो व मोका तपासणी अहवाल नोंदवून अपलोड करणे.

५.१७. अंदाजपत्रकास ज्या प्रचलित मजूरी व सामुग्रीच्या दराने तांत्रिक मान्यता दिलेली आहे, तेच दर दोनही वर्षाकरिता लागू राहतील. या प्रमाणेच मापन पुस्तिकेमध्ये नोंदी घेणे.

५.१८. लागवड केलेल्या रोपांची मर झाल्यास लाभार्थ्याने रोखीने रोपे विकत घेऊन विहित प्रमाणात जिवंत झाडांची टक्केवारी राखणे.

५.१९. जर शेतकऱ्यांनी जिवंत झाडांची विहीत प्रमाणातील टक्केवारी (मुद्दा क्र. ४.७. प्रमाणे) राखली नाही तर वसुलीची कार्यवाही करणे.

## ६. अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या

### ६.१. लाभार्थी

६.१.१. गाव समूहातील इच्छुक शेतकऱ्यांनी प्रकल्पाच्या https://dbt.mahapocra.gov.in वेबसाईटवर नोंदणी पूर्ण झाल्यानंतर DBT App द्वारे online अर्ज करावा.

६.१.२. जर लाभार्थी संयुक्त खातेदार असल्यास, इतर सर्व खातेदारांचे सहमती पत्र घेण्याची जबाबदारी संबधित लाभार्थ्याची राहील. (८-अ चे क्षेत्र ५ हे. च्या आत असावे.)

६.१.३. पुर्वसंमती मिळाल्यानंतरच शेतकऱ्यांनी नजीकच्या वन/ कृषी विद्यापीठ/ कृषी संशोधन केंद्र/ कृषी विज्ञान केंद्र/ शासकीय रोपवाटिका/ किसान रोपवाटिका / खाजगी रोपवाटिका इ. रोपवाटिकामधून वृक्ष रोपे खरेदी करावीत.

६.१.४. पूर्वसंमती मिळाल्यानंतर लाभार्थ्याने वृक्ष लागवडीची कार्यवाही १२० दिवसांमध्ये पूर्ण करावी.

६.१.५. ई-पीक पाहणी ॲपवर सलग वृक्ष लागवडीची नोंदणी करावी.

६.१.६. लागवड पूर्ण झाल्यानंतर रोपे खरेदीची व इतर साहित्याची आवश्यक देयके संकेतस्थळावर अपलोड करून अनुदान मागणी करावी.

६.१.७. प्रकल्पांतर्गत शासनाने ठरवून दिलेली खर्च प्रमाणके सहभागी लाभार्थ्याने मान्य करावीत. प्रमाणापेक्षा जास्त होणाऱ्या खर्चाची जबाबदारी लाभार्थ्याने स्वतः घ्यावी. त्यासाठी आवश्यक असणारी खड्डे खोदणे, माती व खतांच्या मिश्रणाने खड्डे भरणे, रोपे/कलमे लागवड करणे, नांग्या भरणे इत्यादी कामे करण्याची जबाबदारी लाभार्थ्याची राहील.

६.१.८. दुसऱ्या वर्षाचे अनुदान हे लागवड केलेल्या दिनांकापासून एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर देय राहील. त्यानुसार लाभार्थ्याने अनुदान मागणी करावी.

६.१.९. दुसऱ्या वर्षी कमीत कमी मुद्दा क्र. ४.७. प्रमाणे झाडे जिवंत राखण्याची जबाबदारी संपूर्णपणे लाभार्थ्याची असेल.

६.१.१०. लागवड केलेल्या रोपांची मर झाल्यास लाभार्थ्याने रोखीने रोपे विकत घेऊन विहित प्रमाणात जिवंत झाडांची टक्केवारी राखावी.

### ६.२. ग्राम कृषि विकास समिती (GKVS)

६.२.१. शेतकऱ्यांनी केलेल्या ऑनलाईन अर्जांची व अनुषंगिक कागदपत्रांची सहाय्यक कृषि अधिकारी/समूह सहाय्यक यांचे मदतीने छाननी करणे.

६.२.२. मार्गदर्शक सूचनांच्या अधीन राहून लाभार्थी निवडीकरिता सहाय्य करणे.

६.२.३. या घटकाचा अत्यल्प व अल्पभूधारक, अनु. जाती/जमाती, महिला, दिव्यांग संवर्गातील शेतकऱ्यांना प्राधान्याने लाभ देण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत.

६.२.४. वृक्ष लागवड घटकाचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांच्या क्षेत्रांना भेट देणे आवश्यकता असल्यास कृषि विभागाच्या किंवा कृषि विज्ञान केंद्रांच्या तज्ञांना आमंत्रित करणे.

६.२.५. लाभार्थ्यांना त्यांचे अनुभव कथन करण्यासाठी समितीच्या बैठकीस आमंत्रित करणे, जेणेकरून गावातील इतर शेतकरी वृक्ष लागवडीस प्रवृत्त होतील.

**६.३. समूह सहाय्यक**

६.३.१. गाव समूहातील इच्छुक लाभार्थ्यांची नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या संकेत स्थळावर (https://dbt.mahapocra.gov.in ) नोंदणी करणे, अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन व आवश्यकतेनुसार तांत्रिक सहाय्य करणे .

६.३.२. लाभार्थ्यास वृक्ष लागवड या घटकाच्या अटी, शर्ती व तांत्रिक/आर्थिक निकष समजावून सांगणे.

६.३.३. ऑनलाईन अर्जाची छाननी करून लाभ घेण्यास पात्र व अपात्र लाभार्थ्यांची यादी करण्याकरिता सहाय्यक कृषि अधिकारी आणि ग्राम कृषि विकास समितीस मदत करणे.

६.३.४. शेतकऱ्यांनी अर्जासोबत सादर केलेली कागदपत्रे छाननी नंतर, ग्राम कृषि विकास समितीच्या बैठकीचे इतिवृत्त डीबीटी पोर्टलवर अपलोड करणे.

६.३.५. वृक्ष लागवड विषयी तांत्रिक माहिती, हंगामनिहाय सल्ला, हवामानाचा अंदाज, त्यानुसार सल्ला तसेच बाजारभावाबाबत अद्यावत माहिती मिळण्यासाठी शेतकऱ्यांना कृषि विभागाचे महाविस्तार AI मोबाईल app डाउनलोड करण्याविषयी प्रवृत्त करणे

**६.४. सहाय्यक कृषि अधिकारी**

६.४.१. वृक्ष लागवडीकरिता व्यापक प्रसिध्दी देण्यासाठी वेळोवेळी गावस्तरावर होणा-या बैठका/मेळावे/ भेटींद्वारे सदर घटकाचा प्रचार व प्रसार करणे.

६.४.२. शेतकऱ्यांचे अर्ज व सोबत सादर केलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे. लाभार्थ्याने यापूर्वी त्याच क्षेत्रासाठी लाभ घेतला होता किंवा कसे, तसेच अर्जदाराचे ८ अ ची क्षेत्र मर्यादा इ. बाबी तपासणे.

६.४.३. सहाय्यक कृषि अधिकारी यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून प्रस्तावीत क्षेत्र हे वृक्ष लागवडीस तांत्रिक दृष्ट्या योग्य आहे काय, याची खात्री करणे. प्रकल्पाच्या DBT app मध्ये आवश्यक माहिती भरणे व भौगोलिक स्थानांकन (Geo tagging) सहित फोटो घेऊन ऑनलाईन स्थळ पाहणी अहवाल सादर करणे. (डेस्क २)

६.४.४. स्थळ पाहणी झाल्यानंतर योजनेच्या तांत्रिक व आर्थिक मापदंडानुसार क्षेत्राचे अंदाजपत्रक तयार करणे व पूर्वसंमती साठी तालुका कृषी अधिकारी यांचेकडे ऑनलाईन सबमिट करणे.

६.४.५. सहाय्यक कृषि अधिकारी यांनी पुर्वसंमती प्राप्त क्षेत्रावरच वृक्ष लागवड झाल्याची खात्री करणे.

६.४.६. पुर्वसंमती शिवाय लागवड केलेले क्षेत्र अनुदानास पात्र ठरणार नाही, याची दक्षता घेणे.

६.४.७. लाभार्थ्यांनी पूर्वसंमती प्राप्त नियोजित प्रकल्प क्षेत्रावर रोपे लागवड केल्यानंतर मार्गदर्शक सूचनेत दिल्याप्रमाणे तपासणी करून मोका तपासणी अहवाल देय अनुदानाच्या शिफारशीसह DBT पोर्टलवर अपलोड करणे. ( डेस्क ४ )

६.४.८. सहाय्यक कृषि अधिकारी यांनी वृक्ष लागवडीच्या मापन पुस्तिकेतील नोंदी, भौगोलिक स्थानांकनासह घेण्यात आलेले फोटो व मोका तपासणी अहवाल नोंदवून अपलोड करावेत. (डेस्क ४)

६.४.९. वैयक्तिक लाभार्थ्यांच्या अनुदान मागणीसाठी देयके व आवश्यक कागदपत्रे प्रमाणित करून संकेतस्थळावर अपलोड करणे. प्रत्यक्ष खर्च जर मापदंडानुसार निश्चित केलेल्या खर्चापेक्षा कमी असेल तर प्रत्यक्ष खर्चा एवढे अनुदान अनुज्ञेय राहील, याची काळजी घ्यावी.

६.४.१०. दरवर्षी जिवंत झाडांची टक्केवारी तपासून लाभार्थ्याने लागवड केलेली रोपांची मोठ्या प्रमाणात मर झालेली आहे किंवा झाडे काढून टाकलेली आहेत, असे निदर्शनास आल्यास, मापन पुस्तीकेमध्ये तसे नमूद करून, तात्काळ अनुदान थांबविण्याकरिता तसेच अदा करण्यात आलेले अनुदान वसूल करण्याकरिता तालुका कृषि अधिकारी यांचेकडे लेखी शिफारस करणे.

६.४.११. लाभार्थ्याने लागवड केलेल्या दिनांकापासून एक वर्ष पूर्ण झाल्यानंतरच दुसऱ्या वर्षाचे अनुदान मागणी केल्यानंतर सहाय्यक कृषि अधिकारी यांनी वृक्ष लागवडीच्या सदर वर्षीच्या मापन पुस्तिकेतील नोंदी, भौगोलिक स्थानांकनासह घेण्यात आलेले फोटो व मोका तपासणी अहवाल नोंदवून अपलोड करावेत.

६.४.१२. अंदाजपत्रकास ज्या प्रचलित मजूरी व सामुग्रीच्या दराने तांत्रिक मान्यता दिलेली आहे, तेच दर दोनही वर्षाकरिता लागू राहतील. या प्रमाणेच मापन पुस्तिकेमध्ये नोंदी घेणे.

६.४.१३. वृक्ष लागवड विषयी तांत्रिक माहिती, हंगामनिहाय सल्ला, हवामानाचा अंदाज, त्यानुसार सल्ला तसेच बाजारभावाबाबत अद्यावत माहिती मिळण्यासाठी शेतकऱ्यांना कृषि विभागाचे महाविस्तार AI मोबाईल app डाउनलोड करण्याविषयी प्रवृत्त करणे.

६.४.१४. वृक्ष लागवड घटकाच्या प्रक्रियेस अनुसरून मध्यावधी आणि अंतिम मूल्यमापनास प्रकल्प यंत्रणेला मदत करणे.

### ६.५. उप कृषि अधिकारी

६.५.१. पर्यवेक्षीय तपासणी अहवाल तयार करून लाभार्थीच्या स्वाक्षरीसह पोर्टलवर अपलोड करणे.

६.५.२. वृक्ष उत्पादकांना लागवड विषयक संपूर्ण तांत्रिक, लागवडीनंतर संवर्धन विषयक माहिती देणे आणि वेळोवेळी सल्ला देणे.

६.५.३. सहाय्यक कृषि अधिकारी यांनी वृक्ष लागवडीची मापनपुस्तिकेत नोंदविलेल्या नोंदींची खात्री करून प्रमाणित करणे, जर लाभार्थ्याने जिवंत झाडांचे योग्य प्रमाण राखले नसेल तर अनुदान थांबविण्यासाठी तालुका कृषी अधिकारी तसेच उपविभागीय कृषी अधिकारी यांना लेखी कळविणे.

### ६.६. मंडळ कृषि अधिकारी

६.६.१. पर्यवेक्षीय तपासणी अहवाल तयार करून लाभार्थीच्या स्वाक्षरीसह पोर्टलवर अपलोड करणे.

६.६.२. वृक्ष उत्पादकांना लागवड विषयक संपूर्ण तांत्रिक, लागवडीनंतर संवर्धन विषयक माहिती देणे आणि वेळोवेळी सल्ला देणे.

६.६.३. सहाय्यक कृषि अधिकारी यांनी नोंदविलेल्या मापनपुस्तिकेतील नोंदींची खात्री करून प्रमाणित करणे, जर लाभार्थ्याने जिवंत झाडांचे योग्य प्रमाण राखले नसेल तर अनुदान थांबविण्यासाठी तालुका कृषी अधिकारी तसेच उपविभागीय कृषी अधिकारी यांना लेखी कळविणे.

### ६.७. तालुका कृषी अधिकारी

६.७.१. सहाय्यक कृषि अधिकारी यांनी प्रस्तावित क्षेत्र हे वृक्ष लागवडीसाठी तंत्रिक दृष्ट्या योग्य असलेबाबत ऑनलाईन स्थळ पाहणी अहवाल, लाभार्थी पात्रतेबाबातचा अभिप्राय व शेतकऱ्याने अर्ज केलेल्या क्षेत्राचे अंदाजपत्रक सादर केल्यानंतर ते तपासून योग्य असल्यास त्यास पोर्टलवरून पूर्वसंमती प्रदान करणे. (डेस्क ३)

६.७.२. शेतकऱ्यांना वेळोवेळी विविध क्षेत्रीय कार्यक्रमांच्या माध्यमातून लागवड करणेकरिता, तसेच दुष्काळसदृश परिस्थितीमध्ये झाडे जगविणे संदर्भात आवश्यक उपाययोजना करणेबाबत मार्गदर्शन करणे.

६.७.३. शेतकऱ्याने जिवंत झाडांचे प्रमाण राखले नसल्यास अनुदान थांबविण्यासाठी उपविभागीय कृषी अधिकारी यांना लेखी शिफारस करणे.

६.७.४. या अनुषंगाने, शेतकऱ्याने जिवंत झाडांचे प्रमाण राखले नसतानाही, अशा लागवडीच्या मापन पुस्तिकेमध्ये नोंदी घेऊन अनुदान अदा करण्याकरिता शिफारस केल्याचे आढळून आल्यास, तालुकास्तरीय संबंधित सर्व अधिकारी-कर्मचारी यासाठी जबाबदार राहतील.

६.७.५. तालुक्यातील वृक्ष लागवड केलेल्या गावांना भेटी देऊन पर्यवेक्षीय तपासणी करणे.

### ६.८. उपविभाग स्तर (लेखाधिकारी)

६.८.१. अनुदान मागणी प्रस्ताव व तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर लेखाधिकारी उपविभाग स्तर यांनी अनुदान प्रस्ताव तपासून शिफारशीत करण्यात आलेली रक्कम मार्गदर्शक सुचनेनुसार असल्याची खात्री करणे.

६.८.२. अंदाजपत्रकास ज्या प्रचलित मजूरी व सामुग्रीच्या दराने तांत्रिक मान्यता दिलेली आहे, तेच दर दोनही वर्षांकरिता लागू राहतील. याप्रमाणेच मापन पुस्तिकेमध्ये नोंदी घेण्यात आलेल्या आहेत का याची पडताळणी करणे.

६.८.३. पात्र प्रस्तावांची उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे अनुदान अदायगीसाठी शिफारस करणे.

### ६.९. उपविभागीय कृषि अधिकारी

६.९.१. वृक्ष लागवड करणे संदर्भात तसेच दुष्काळसदृश परिस्थिती मध्ये झाडे जगविणे संदर्भात आवश्यक उपाययोजना करणेबाबत मार्गदर्शन व व्यापक प्रसिध्दी देण्यासाठी प्रकल्प गावांमध्ये वेळोवेळी गावस्तरावर होणा-या बैठका/मेळावे/भेटीव्दारे मार्गदर्शन करण्याच्या सूचना सहाय्यक कृषि अधिकारी, उप कृषि अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांना देणे.

६.९.२. नैसर्गिक आपत्तीसारखी अपवादात्मक परिस्थिती वगळता लाभार्थ्याने जिवंत झाडांचे प्रमाण निकषानुसार राखले नसल्याबाबत अधिनस्त अधिकाऱ्यांनी कळविल्यास किंवा तसे निदर्शनास आल्यास प्रकल्प कक्षाकडे पुढील अनुदान थांबविण्यासाठी शिफारस करणे व यापूर्वी अदा करण्यात आलेले अनुदान वसूल करणेबाबत कार्यवाही सुरु करणे.

६.९.३. सहाय्यक कृषि अधिकारी यांचेकडून अनुदान प्रस्ताव व मोका तपासणी अहवाल प्राप्त झालेनंतर लाभार्थीच्या कागदपत्रांच्या बाबतीत कार्यालयातील लेखा अधिकाऱ्यांचे (डेस्क ५) मार्फत छानणी झालेनंतर अनुदानाची परीगणना योग्य/अयोग्य असल्याचे खात्री करून शेतकऱ्याचे अनुज्ञेय अनुदान वर्ग करणेसाठी डीबीटी प्रणालीमध्ये नमूद केल्याप्रमाणे जबाबदाऱ्या पूर्ण करणे.

६.९.४. अंदाजपत्रकास ज्या प्रचलित मजूरी व सामुग्रीच्या दराने तांत्रिक मान्यता दिलेली आहे, तेच दर दोनही वर्षांकरिता लागू राहतील. या प्रमाणेच मापन पुस्तिकेमध्ये नोंदी घेण्यात आलेल्या आहेत का याची पडताळणी करणे.

६.९.५. पूर्वसंमती दिलेल्या शेतकऱ्यांचे सदर घटकासंदर्भात प्रशिक्षण आयोजित करणे.

६.९.६. वृक्ष लागवड घटकाचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांच्या क्षेत्रानां भेट देणे. आवश्यकता असल्यास कृषि विभागाच्या किंवा कृषि विज्ञान केंद्रांच्या तज्ज्ञांना आमंत्रित करणे.

६.९.७. वृक्ष लागवड केलेल्या गावांना भेटी देऊन पर्यवेक्षीय तपासणी करणे.

## ६.१०. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी

६.१०.१. जिल्ह्यामधील प्रकल्प गावांमध्ये लाभार्थी निवड, रोपांची उपलब्धता, वृक्ष लागवड, लागवडीची जोपासना, आपत्कालीन परिस्थितीचे नियोजन इ. सर्व टप्प्यांवर चोख देखरेख ठेवणे.

६.१०.२. जिल्ह्यामध्ये उपविभाग स्तरावर अनुदान अदायगी पूर्वीची सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करणे.

६.१०.३. वृक्ष लागवड केलेल्या जिल्ह्यांतर्गत गावांना भेटी देऊन पर्यवेक्षीय तपासणी करणे.

## ६.११. विभागीय कृषि सहसंचालक

६.११.१. वेळोवेळी आढावा घेऊन प्रकल्प गावांमध्ये वृक्ष लागवडीचे क्षेत्र वाढविणे.

६.११.२. वृक्ष लागवडीची कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करणे.

६.११.३. वृक्ष लागवड केलेल्या गावांना भेटी देऊन पर्यवेक्षीय तपासणी करणे.

## ७. संनियंत्रण, मूल्यमापन व लेखापरीक्षण:

राज्य स्तरावरून प्रकल्प व्यवस्थापन कक्षाव्दारे सदर योजनेचे संनियंत्रण करण्यात येईल तसेच, क्षेत्रीय पातळीवर योजनेची अंमलबजावणी करताना विविध स्तरावरील अधिकाऱ्यांनी संनियंत्रण करावे. झालेल्या कामाची तपासणी करण्यासाठी खालीलप्रमाणे विविध स्तरीय अधिका-यांच्या तपासणीचे प्रमाण खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे. सदर तपासणीचे प्रमाण प्रत्येक आर्थिक वर्षासाठी लागू राहील. (पर्यवेक्षीय तपासणी अहवाल पहावे.)

**पर्यवेक्षकीय तपासणी**

| **अ.क्र.** | **कार्यालय स्तर** | **तपासणीचे प्रमाण (प्रस्तावित)** |
|---|---|---|
| १ | विभागीय कृषि सहसंचालक | १ लाभार्थी प्रती जिल्हा |
| २ | नोडल अधिकारी, विकृससं कार्यालय | ३ लाभार्थी प्रती जिल्हा |
| ३ | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी | १ लाभार्थी प्रती तालुका |
| ४ | नोडल अधिकारी, जिअकृअ कार्यालय | ३ टक्के लाभार्थी |
| ५ | उपविभागीय कृषी अधिकारी | ३ टक्के लाभार्थी |
| ६ | तालुका कृषी अधिकारी | ५ टक्के लाभार्थी |
| ७ | मंडळ कृषी अधिकारी | १५ टक्के लाभार्थी |
| ८ | उप कृषि अधिकारी | ५० टक्के लाभार्थी |

(परिमल सिंह)
प्रकल्प संचालक
नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,मुंबई

## हमीपत्र
## वृक्ष लागवड (सलग)

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत मी **"वृक्ष लागवड घटकांतर्गत सलग लागवड"** या करिता अर्ज करीत आहे. त्यासाठीच्या निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांनूसार विहित अटी व शर्ती मला मान्य असून त्यासाठीचे हमीपत्र सादर करीत आहे.

**मी सत्यप्रतिज्ञेवर प्रमाणित करतो/ करते की,**

१. मी अर्ज केलेल्या क्षेत्रासाठी शासनाच्या फळबाग/वृक्ष/वृक्ष इत्यादी लागवड योजनेमधून सदर क्षेत्रावर लागवडीचा लाभ घेतलेला नाही.

२. सदर योजने अंतर्गत एकूण क्षेत्राप्रमाणे शासनाने प्रतिवर्षी मंजूर केलेल्या मर्यादेच्या प्रमाणापेक्षा जास्त खर्च झाल्यास तो खर्च स्वतः करण्यास तयार आहे.

३. योजने अंतर्गत वृक्ष लागवड झाल्यानंतर त्याची नोंद ७/१२ वर घेण्याची जबाबदारी माझी राहील.

४. वृक्ष लागवडीनंतर पुढील वर्षी किमान ८० टक्के झाडे जिवंत ठेवण्याची जबाबदारी माझी राहील. झाडे वरीलप्रमाणे जिवंत राहिली नाही तर त्याची संपूर्ण जबाबदारी माझी राहिल व यावर झालेला सर्व खर्च व्याजासह मी शासनास परत करण्यास बांधील राहील. तसेच उर्वरीत अनुदान घेण्यास मी पात्र राहणार नाही याची मला जाणीव आहे.

५. वृक्ष लागवड करिता मिळणारे अनुदान २ टप्प्यात मिळणार असून त्यासाठीचे आवश्यक निकष मला मान्य आहेत.

६. या योजनेच्या अटी व शर्तीनुसार वृक्षाची लागवड करण्यास मी बांधील असून त्यात कोणतीही कसुर झाल्यास योजने अंतर्गत अनुदानास मी अपात्र राहील याची मला जाणीव आहे. तसेच दुष्काळसदृश उद्भवल्यास अशा परिस्थिती मध्येही वृक्ष लागवड जगवणे माझी जबाबदारी राहील, तसे न झाल्यास मी मिळालेल्या अनुदानाची वसुली करण्यास पात्र असेल, याची मला जाणीव आहे.

७. या योजने अंतर्गत माझ्याकडून कोणत्याही शासकीय यंत्रणेची फसवणूक झाल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील हे मला ज्ञात आहे..

८. वन/ कृषी संशोधन केंद्र/ कृषी विद्यापीठ/ कृषी विज्ञान केंद्र/ शासकीय रोपवाटिका/ किसान रोपवाटिका / खाजगी रोपवाटिका इत्यादी रोपवाटीकेवरुन उचल केलेल्या वृक्ष रोपांची लागवड मी करेन.

९. मी घोषित करतो / करते की सदर अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहिती व विश्वासानुसार सत्य व अचूक आहे.

**हमीपत्र**

**वृक्ष लागवड (परिघीय क्षेत्र व बांधावरील लागवड)**

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत मी **"परिघीय क्षेत्र व बांधावरील लागवड"** या करिता अर्ज करीत आहे. त्यासाठीच्या निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांनूसार विहित अटी व शर्ती मला मान्य असून त्यासाठीचे हमीपत्र सादर करीत आहे.

**मी सत्यप्रतिज्ञेवर प्रमाणित करतो/ करते की,**

१. मी अर्ज केलेल्या क्षेत्रासाठी शासनाच्या फळबाग/वृक्ष/वृक्ष इत्यादी लागवड योजनेमधून सदर क्षेत्रावर लागवडीचा लाभ घेतलेला नाही.

२. सदर योजने अंतर्गत एकूण क्षेत्राप्रमाणे शासनाने प्रतिवर्षी मंजूर केलेल्या मर्यादेच्या प्रमाणापेक्षा जास्त खर्च झाल्यास तो खर्च स्वतः करण्यास तयार आहे.

३. योजने अंतर्गत वृक्ष लागवड झाल्यानंतर त्याची नोंद ७/१२ वर घेण्याची जबाबदारी माझी राहील.

४. वृक्ष लागवडीनंतर पुढील वर्षी किमान ८० टक्के झाडे जिवंत ठेवण्याची जबाबदारी माझी राहील. झाडे वरीलप्रमाणे जिवंत राहिली नाही तर त्याची संपूर्ण जबाबदारी माझी राहिल व यावर झालेला सर्व खर्च व्याजासह मी शासनास परत करण्यास बांधील राहील. तसेच उर्वरीत अनुदान घेण्यास मी पात्र राहणार नाही याची मला जाणीव आहे.

५. वृक्ष लागवड करिता मिळणारे अनुदान २ टप्प्यात मिळणार असून त्यासाठीचे आवश्यक निकष मला मान्य आहेत.

६. या योजनेच्या अटी व शर्तीनुसार वृक्षाची लागवड करण्यास मी बांधील असून त्यात कोणतीही कसुर झाल्यास योजने अंतर्गत अनुदानास मी अपात्र राहील याची मला जाणीव आहे. तसेच दुष्काळसदृश उद्भवल्यास अशा परिस्थिती मध्येही वृक्ष लागवड जगवणे माझी जबाबदारी राहील, तसे न झाल्यास मी मिळालेल्या अनुदानाची वसुली करण्यास पात्र असेल, याची मला जाणीव आहे.

७. या योजने अंतर्गत माझ्याकडून कोणत्याही शासकीय यंत्रणेची फसवणूक झाल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील हे मला ज्ञात आहे..

८. वन/ कृषी संशोधन केंद्र/ कृषी विद्यापीठ/ कृषी विज्ञान केंद्र/ शासकीय रोपवाटिका/ किसान रोपवाटिका / खाजगी रोपवाटिका इत्यादी रोपवाटीकेवरुन उचल केलेल्या वृक्ष रोपांची लागवड मी करेन.

९. मी घोषित करतो / करते की सदर अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहिती व विश्वासानुसार सत्य व अचूक आहे.

**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प**
**मोका तपासणी अहवाल (प्रथम वर्ष)**

**सलग लागवड**

(सहाय्यक कृषि अधिकारी यांनी तपासणी करून भरावे)

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | लाभार्थ्याचे नाव | |
| २ | गावाचे नाव | |
| ३ | तालुका | |
| ४ | जिल्हा | |
| ५ | तपासणी केल्याचा दिनांक | |
| ६ | बाब | **वृक्ष लागवड (सलग)** |
| ७ | पूर्वसंमती क्र.व दिनांक | |
| ८ | वृक्षाचे नाव | |
| ९ | रोपवाटीकेचे नाव, पत्ता | |
| १० | वृक्ष लागवड मंजूर असलेल्या शेताचा सर्व्हे नंबर/गट क्र. व क्षेत्र (हे.) | सर्व्हे नंबर/गट क्र…………,<br>क्षेत्र --------हे |
| ११ | प्रत्यक्ष वृक्ष लागवड केलेल्या शेताचा सर्व्हे नंबर/गट क्र.व क्षेत्र (हे.) | सर्व्हे नंबर/गट क्र…………,<br>क्षेत्र --------हे |
| १२ | वृक्ष लागवडीचा दिनांक | |
| १३ | कलम / रोपांचे वय (महिना/वर्ष) | |
| १४ | दोन ओळींमधील | ………………मी. |
| १५ | दोन रोपामधील अंतर | ………………मी. |
| १६ | कलमे /रोपे संख्या ( एकूण कलमे/रोपे संख्या नमूद करावी) | |
| १७ | जमिनीचा प्रकार (हलकी/मध्यम/भारी/कातळ/पडीक) | |
| १८ | ओलिताचे इतर साधने (शेततळे, विहीर, लिफ्ट, कॅनॉल व नदी इ.) | |
| १९ | लागवड करावयाच्या क्षेत्रावर ठिबक सिंचन संच कार्यान्वित आहे काय?<br>असल्यास संच चालू स्थितीत आहे किवां काय ? | |
| २० | नव्याने ठिबक सिंचन संचाची जोडणी करून कार्यान्वित केला आहे काय? | होय/नाही |
| २१ | मार्गदर्शक सुचनेतील निकषानुसार वृक्ष लागवडीमध्ये उणीवा आढळल्यास त्याचा थोडक्यात तपशील- | |
| २२ | अनुदानाची गणना: (खालील बाबी विचारात घेऊन देय अनुदानाची शिफारस करावी.)<br>अ) वृक्ष लागवड केलेले क्षेत्र --------हे .<br>ब) कलमे /रोपे संख्या - --------------<br>क) रोपांचा दर प्रती कलम/रोप - रु. ---------------<br>ड) वृक्ष लागवडीचा एकूण खर्च- रु. ------------<br>इ) तपासणीनुसार देय होणारी रक्कम- रु ----------- | |

वृक्ष लागवड या घटकांतर्गत वृक्ष लागवड, मार्गदर्शक सूचनेनुसार पूर्ण केली असलेने/नसलेने लाभार्थ्यास अनुदान अदा करण्यास शिफारस करण्यात येत आहे/नाही.

समक्ष-

**लाभार्थ्याचे/प्रतिनिधीचे नाव व स्वाक्षरी /अंगठा**
**(श्री. )**

**( स्वाक्षरी ) सहाय्यक कृषि अधिकारी**
**दिनांकीत स्वाक्षरी करावी**

(टिप-सदर तपासणी अहवालाची एक प्रत लाभार्थ्यास द्यावी)

सोबत- मापनपुस्तिका

**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प**
**मोका तपासणी अहवाल (प्रथम वर्ष)**
**बांधावरील लागवड**

(सहाय्यक कृषि अधिकारी यांनी तपासणी करून भरावे)

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | लाभार्थ्याचे नाव | |
| २ | गावाचे नाव | |
| ३ | तालुका | |
| ४ | जिल्हा | |
| ५ | तपासणी केल्याचा दिनांक | |
| ६ | बाब | **वृक्ष लागवड (परिघीय क्षेत्र व बांधावरील लागवड** |
| ७ | पूर्वसंमती क्र.व दिनांक | |
| ८ | वाण | |
| ९ | रोपवाटीकेचे नाव, पत्ता | |
| १० | बांधावर वृक्ष लागवड मंजूर असलेल्या शेताचा सर्व्हे नंबर/गट क्र. व क्षेत्र (हे.) | सर्व्हे नंबर/गट क्र…………, क्षेत्र --------हे |
| ११ | प्रत्यक्ष बांधावर वृक्ष लागवड केलेल्या शेताचा सर्व्हे नंबर/गट क्र.व क्षेत्र (हे.) | सर्व्हे नंबर/गट क्र…………, क्षेत्र --------हे |
| १२ | वृक्ष लागवडीचा दिनांक | |
| १३ | कलम / रोपांचे वय (महिना/वर्ष) | |
| १४ | दोन रोपामधील अंतर | ……………..मी. |
| १५ | कलमे /रोपे संख्या ( एकूण कलमे/रोपे संख्या नमूद करावी) | |
| १६ | जमिनीचा प्रकार (हलकी/मध्यम/भारी/कातळ/पडीक) | |
| १७ | ओलिताचे इतर साधने (शेततळे, विहीर, लिफ्ट, कॅनॉल व नदी इ.) | |
| १८ | मार्गदर्शक सुचनेतील निकषानुसार वृक्ष लागवडीमध्ये उणीवा आढळल्यास त्याचा थोडक्यात तपशील- | |
| १९ | अनुदानाची गणना: (खालील बाबी विचारात घेऊन देय अनुदानाची शिफारस करावी.)<br>अ) कलमे /रोपे संख्या - --------------<br>ब) रोपांचा दर प्रती कलम/रोप - रु. ---------------<br>क) वृक्ष लागवडीचा एकूण खर्च- रु. ------------<br>ड) तपासणीनुसार देय होणारी रक्कम- रु ----------- | |

वृक्ष लागवड या घटकांतर्गत वृक्ष लागवड, मार्गदर्शक सूचनेनुसार पूर्ण केली असलेने/नसलेने लाभार्थ्यास अनुदान अदा करण्यास शिफारस करण्यात येत आहे/नाही.

समक्ष-

**लाभार्थ्याचे/प्रतिनिधीचे नाव व स्वाक्षरी /अंगठा**
**(श्री. )**

**(स्वाक्षरी) सहाय्यक कृषि अधिकारी**
**दिनांकीत स्वाक्षरी करावी**

(टिप-सदर तपासणी अहवालाची एक प्रत लाभार्थ्यास द्यावी)

सोबत- मापनपुस्तिका

**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प**

**वृक्ष लागवड**

**पर्यवेक्षीय तपासणी अहवाल**

| | | |
|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | |
| २. | तपासणी अधिकारी | श्री/श्रीमती |
| ३. | पदनाम | |
| ४. | तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी | १. श्री/श्रीमती<br>पदनाम<br>२. श्री/श्रीमती<br>पदनाम |
| ५. | लाभार्थ्याचे नाव | सर्वे नं<br>वर्गवारी: ____________<br>(अ.जा./अ.ज./सर्वसाधारण)<br>मु.पो. ता. उपविभाग<br>जि. |
| ६. | बाब | वृक्ष लागवड अंतर्गत ---------रोपे/कलमे |
| ७. | लागवडीचे वर्ष | |
| ८. | लागवडीचे क्षेत्र (हे. आर.) | |
| ९. | प्रकल्पाचा मोका तपासणी तपशील | १. रोपे/कलमांची एकूण संख्या ---------------<br>२. जिवंत रोपे/कलमांची एकूण संख्या ----------<br>३. झाडांची सरासरी उंची ---------------(सेंमी)<br>४. झाडांमधील अंतर ------------------- (मी) |
| १०. | जिवंत रोपे संख्या निर्धारित संख्येपेक्षा कमी आढळल्यास त्याची करणे | १. नैसर्गिक आपत्ती (वादळ/गारपीट/ पूर /दुष्काळ)<br>२. झाडांची निगा न राखल्यामुळे |
| ११. | अनुदानासाठी शिफारस करण्यात येत आहे काय? | होय/नाही |
| १२. | लाभार्थ्यास देण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम रु. | |
| १३. | तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ? | होय/नाही |
| | नसल्यास तफावत रक्कम रु. | |
| १४. | मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? | होय/नाही |
| १५. | लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय | |

| | |
|---|---|
| | |
| १६. | गुणवत्तेबाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय |
| | |

तपासणी अधिकारी, श्री.
पदनाम.
(स्वाक्षरी)

इतर अधिकारी श्री.
पदनाम.
( स्वाक्षरी )

लाभार्थ्याची/प्रतिनिधीची स्वाक्षरी
(नाव.........................)

## परिशिष्ट - "अ"

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प

### वानिकी आधारित शेतीपद्धती अंतर्गत वृक्ष लागवड कार्यक्रम सन २०२५-२६

### सलग वृक्ष लागवड आर्थिक मापदंड

क्षेत्र : १ हे. झाडे संख्या: १०० अंतर- १० X १० मीटर मजुरी दर: ३१२ रु.

| अ.क्र. | बाब | पहिले वर्ष | | | | दुसरे वर्ष | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मजुरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजुरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजुरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १ | खड्डे खोदणे (०.६० *०.६०*०.६० मी) | ३९०० | ० | ३९०० | १२.५ | ० | ० | ० | ० | ३९०० | ० | ३९०० | १२.५ |
| २ | माती व खत मिश्रणाने खड्डे भरणे | ३१२० | १६९८ | ४८१८ | १० | ० | ० | ० | ० | ३१२० | १६९८ | ४८१८ | १० |
| ३ | रोपे/कलमे लागवड करणे. लागवडीची १०० रोपे + १०% मरगळीची रोपे. रु ४०/- प्रती कलम रोपे (कमाल ) किंवा प्रत्यक्ष दर यापैकी जे कमी असेल ते. | ३१२० | ४००० | ७१२० | १० | ० | ० | ० | ० | ३१२० | ४००० | ७१२० | १० |
| ४ | नांग्या भरणे | ३१२ | ४०० | ७१२ | १ | ३१२ | ४०० | ७१२ | १ | ६२४ | ८०० | १४२४ | २ |
| **एकूण** | | **१०४५२** | **६०९८** | **१६५५०** | **३३.५** | **३१२** | **४००** | **७१२** | **१** | **१०७६४** | **६४९८** | **१७२६२** | **३४.५** |